# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला सबलीकरणासाठीचे योगदान

**प्रा. ज्योती विशाल लेंगरे** शारीरिक शिक्षण संचालिका, कमला कॉलेज,कोल्हापूर. Mail Id :- jlengare09@gmail.com

---

**प्रस्तावना :-**

भारत हा पुरुषप्रधान संस्कृती जपणारा देश मानला जातो. भारतात फार पूर्वीच्या काळापासून महिलांना दुय्यम दर्जा दिला गेला आहे. महिलांनी नेहमी पुरुषांच्या आज्ञेत राहिले पाहिजे या विचारांचा समाज फार पूर्वीपासून भारतातील समाजात आजही वावरताना दिसतो. मात्र काही विचारवंत,संत,समाज सुधारक यांनी स्त्रियांच्या हक्कासाठी त्यांच्या न्यायासाठी आवाज उठवला. यामध्ये डॉ. राजाराम मोहन रॉय, महर्षी धोंडो केशव कर्वे,महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इत्यादी समाज सुधारकांचा उल्लेख करणे महत्त्वाचे ठरते. आधुनिक भारताच्या इतिहासात अतिशय नामवंत असे कायदे पंडित म्हणून ओळखले जाणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीव्यवस्था, अस्पृश्यता निवारणाबरोबर स्त्रियांना समान हक्क मिळवून देण्यासाठी महत्त्वाचे कार्य केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्र, राज्यशास्त्र तसेच समाजशास्त्र विषयाचे गाढे अभ्यासक होते. त्यामुळे त्यांनी सर्वच बाजूंनी महिला सबलीकरणाचे काम केले आहे. त्यांना युगपुरुष म्हणून देखील संबोधले जाते कारण हजारो वर्षापासून चालत आलेल्या भारतीय समाज व्यवस्थेच्या विरुद्ध बंड पुकारण्याचे काम त्यांनी केले. ज्या कालखंडात डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज कार्य करण्यात सक्रिय होते तेव्हा भारतातील महिलांची अवस्था अतिशय दयनीय अशी होती. त्याकाळी मुलीने जन्म घेतला तर ती अतिशय दुःखद घटना समजली जायची. मात्र त्याच कालखंडात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रीला सात रत्ना पैकी एका रत्नाचे उपमा दिली आहे. स्त्रीमुक्ती ही मुळात ऐतिहासिकदृष्ट्या उपेक्षित असलेल्या समाजातील महिलांची शारीरिक मानसिक आणि राजकीय स्थिती सुधारण्याची प्रक्रिया आहे. सर्व प्रकारच्या हिंसाचारापासून त्यांचे रक्षण करण्याची ही प्रक्रिया आहे. यासाठी महिलांचे सक्षमीकरण,सबलीकरण होणे गरजेचे आहे आणि त्या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या कालावधीत मोलाचे कार्य केलेले आहे.

**व्याख्या**

**महिला सबलीकरण / सक्षमीकरण :-**

1. "स्त्रियांना समाजात समान संधी निर्माण करून देणे व विकासाची समान संधी देणे. महिलांना सर्वच क्षेत्रात समान संधी देऊन त्यांच्यातील आत्मविश्वास वाढवणे व त्यांच्या कर्तृत्व गुणांची जाणीव करून देणे म्हणजे महिला सबलीकरण होय."
2. "स्त्रियांचा मानसिक, शारीरिक, बौद्धिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, भावनिक व कौटुंबिक विकास म्हणजे महिला सक्षमीकरण होय."

**महिला सबलीकरण कल्पनेचा उगम :-**

भारतीय पुरुष प्रधान संस्कृतीत अंधश्रद्धा आणि चुकीच्या प्रथांमुळे वैदिक काळापासून स्त्रियांना प्रचंड समस्यांना तोंड द्यावे लागले आहे. मग ती स्त्री कोणत्याही जाती धर्माची असो किंवा उच्च घराण्यातील असो, उच्च वर्णीय असो स्त्री म्हणजे ती शूद्रच मानली जात असे. बालविवाह, सती प्रथा, विधवा पुनर्विवाह बंदी, विधवेचा गैरवापर, देवदासी प्रथा अशा अनेक मार्गाने स्त्रियांवर अत्याचार केले जात होते. त्यामुळे या अत्याचारीत समाज व्यवस्थेत स्त्री म्हणून जन्म घेणे जवळजवळ एक प्रकारची शिक्षा मानली जायची. याच अत्याचारित समाज व्यवस्थेने महिलांना प्रवृत्त केले आणि त्यांच्या सामाजिक, आर्थिक व वैयक्तिक वाढीसाठी एक महत्त्वपूर्ण अडथळा म्हणून त्यांच्यावर लादलेली बंधनेच आहेत हे ओळखायला भाग पाडले. अशा महिलांवर घातलेल्या बंधनामुळे व होणाऱ्या अन्यायामुळे समाजात डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्यासारखे इतर नेते घडले. महिलांनी या अन्याय, शोषण, भीती, लैंगिक भेदभाव व या परंपरागत पुरुषप्रधान व्यवस्थेतील छळांना न घाबरता सुटकेचा श्वास घेतला पाहिजे,आपल्या पायावर उभे राहिले पाहिजे. समाजाची प्रगती ही महिलांच्या प्रगतीवर अवलंबून असते या मताचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. आणि याच दृष्टिकोनातून त्यांनी महिला सक्षमीकरण, सबलीकरणासाठी आपले पाऊल उचलले.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महिला सबलीकरण :-**

वेदिक काळापासून पुरुषांनी स्त्रियावर वर्चस्व गाजवले मात्र ते आजच्या एकविसाव्या शतकात कमी झाल्याचे दिसून येते.याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सारख्या सामाजिक कार्यासाठी स्वतःला झोकून देणाऱ्या समाजसुधारक, थोर विचारवंत यांना जाते. अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांच्या अन्यायाविरुद्ध लढाऊ ठेवला त्यांच्या हक्कासाठी झगडले व

या सर्व समाज सुधारकांचा वारसा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुढे भक्कमपणे चालवला त्यांनी त्यांच्या दूरदृष्टीने ते कार्य पुढे तर चालू ठेवलेच, त्याचबरोबर त्याला घटनेचे कायद्याचे कवच ही दिले जेणेकरून पुढील अनेक पिढ्यांमधील स्त्रियांना त्याचा लाभ मिळेल.

आज स्वतंत्र्य भारतात कित्येक अधिकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे मिळाले आहेत. या अधिकारांमुळे महिलांना समाजात समान हक्क,प्रतिष्ठा, दर्जा प्राप्त झाला आहे. समाजात स्त्री व पुरुष दोन्ही घटक महत्त्वाचे आहेत.एक घटक विषम असेल तर समाज प्रगती करू शकत नाही. स्त्रिया बद्दल अतिशय नीच पातळीवरील अपमानास्पद वर्णन करणारी मनुस्मृती डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जाहीरपणे जाळून खऱ्या अर्थाने स्त्री स्वातंत्र्याचा जाहीरनामास केला. महाड येथे झालेल्या तीन दिवशीय सत्याग्रह परिषदांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तिसऱ्या दिवशी स्त्रियांना उद्देशून भाषण केले होते. त्यांनी स्त्रियांनी आपले राहणीमान कसे सुधारावे याचे मार्गदर्शन केले होते. जाती अंतासाठी स्त्रियांनीच पुढाकार घ्यावा असे महार सत्याग्रह परिषदेत त्यांनी जाहीर सांगितले होते. स्वातंत्र्य, समता व बंधुता ही त्रिसूत्रे त्यांच्या चिकित्सेचा पाया होती त्यांनी मागील इतिहासाचा अभ्यास करून स्त्रीचे स्थान काय ते तपासले विधवा विवाह, आंतरजातीय विवाह हे व्हायला हवेत व त्यांची गरज काय त्यांनी स्पष्टपणे समाजापुढे मांडले होते. आज मुली शिकतात,नोकऱ्या करतात,अर्थाजन करतात, राजकारण, खेळ, चित्रपट, कलाक्षेत्र इत्यादी ठिकाणी महिलांचे प्रमाण वाढले आहे. ते फक्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बनवलेल्या कायद्यातील कलम 15 व 16 ने दिलेल्या अधिकारामुळे आपण महिलांना त्या क्षेत्रात प्रगती करताना बघतो आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाबाई यांनी पण त्यांच्यासमवेत अनेक चळवळीमध्ये आपले योगदान दिले.त्यांच्यामुळे नाशिक येथील काळाराम मंदिरात प्रवेश व महार सत्याग्रहांमध्ये महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात होती.भारतातील सर्व जाती धर्मातील स्त्रियांना जाचक रूढी आणि परंपरा पासून सुटका मिळावी यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अथक प्रयत्न केले.तसेच इतिहासकालीन स्त्रियांच्या परिस्थितीचा अभ्यास केला, त्याचे चिंतन करून त्यावर अनेक लेखांचे लिखाण केले, अनेक आंदोलने केली. फक्त यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर थांबले नाहीत तर या सर्वांना त्यांनी कायद्यात बसवले अगदी सक्षमपणे महिलांना अधिकार मिळावेत म्हणून त्यांनी अत्यंत कठोर मेहनत घेऊन, सर्व बारकावे तपासून, भविष्याचा वेध घेऊन 'हिंदू कोड बिल' चा मसुदा लिहिला. हा मसुदा लिहायला त्यांना तब्बल ४ वर्ष १ महिना व २६ दिवस लागले. हे हिंदू कोड बिल पास करण्यासाठी त्यांनी बऱ्याच नेत्यांशी संघर्ष केला परंतु त्यावेळच्या राजकारणी व समाजकारण्यांनी त्यांना सहकार्य केले नाही. बिल पास न झाल्यामुळे त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. स्त्रियांच्या कल्याणासाठी त्यांनी सर्व अधिकार कायद्याच्या चौकटीत बसवण्यासाठी खूप परिश्रम घेतले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे बोलते सुधारक नव्हते तर कर्ते सुधारक होते. कायद्याचे कवच असल्यावर स्त्रियांना त्यांचे हक्क मिळतीलच ही दूरदृष्टी ठेवून त्यांनी ते कायदेमंत्री असताना तसे कायदे अस्तित्वात आणले.

त्यांनी आपल्या लेखणीचा वापर महिला जागृतीसाठी केला. मूकनायक व बहिष्कृत भारत या त्यांच्या वर्तमानपत्रामुळे त्यांनी समाज जागृतीचे कार्य केले. त्याचाच परिणाम म्हणून तुळशीबाई बनसोडे या महिलेने 'चोखामेळा' हे वृत्तपत्र सुरू केले व समाजातील कुप्रथांवर घाला घालण्याचे काम केले. त्याचबरोबर मुंबईतील कामाठीपुरात देहविक्री करणाऱ्या महिलांचा मध्यस्थी / दलाल म्हणून काम करणारा व्यक्ती डॉ. बाबासाहेब यांच्या विचारांनी प्रेरित होऊन तो व्यवसाय सोडून त्या महिलांच्या विकासासाठी व मुक्तीसाठी काम करू लागला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते स्त्रियांना विवाहाचा, जोडीदार निवडण्याचा घटस्फोटाचा व पोटगीचा अधिकार असावा. त्याचबरोबर वडिलोपार्जित संपत्तीत महिलांना समान वाटा मिळावा या मताचे ते होते. महिलांना पुरुषांबरोबर वेतन मिळावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. तसेच काम करणाऱ्या व नोकरदार महिलांना प्रसूती नंतर विश्रांती व बाल संगोपणासाठी रजा मंजूर करून महिला विकासाबाबत आपली कटीबद्धता दर्शविली.

**निष्कर्ष :-**

1.सदर शोधनिबंधात असे दिसून येते की पूर्वीचे समाजसुधारक डॉ.राजाराम मोहन रॉय, महर्षी धोंडो केशव कर्वे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांची स्थिती जाणून घेऊन त्यांच्या न्यायासाठी व त्यांचे हक्क त्यांना मिळण्यासाठी खूप परिश्रम घेतले.

2.डॉ.बाबासाहेब आंबेडकर कायदेमंत्री असताना त्यांनी महिलांची स्थिती सुधारावी म्हणून अनेक कायदे अस्तित्वात आणले.

3.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांच्या हक्कांना घटनात्मक रित्या तरतूद करून कायदेशीर संरक्षण मिळवून दिले.

4.त्याकाळी केलेला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा स्त्रियांच्या हक्काप्रती असलेला विचार आजही समाजासाठी दिशादर्शक आहे.

5.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते एखाद्या समाजाची प्रगती मोजायची असेल तर त्या समाजातील महिलांची प्रगती किती झाली आहे हे मोजणे गरजेचे आहे.

6.एकंदरीत संपूर्ण शोधनिबंधातून असा निष्कर्ष निघतो की २१ व्या शतकातील भारत महिलांच्या प्रगती शिवाय महासत्ता होऊ शकत नाही याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आपल्याला करून देतात.

**संदर्भ सूची :-**


- डॉ. बाबासाहेब - स्त्रीमुक्ती - प्रा.प्रतिभा परदेशी
- भारतातील महिला विकासाची वाटचाल - पुष्पा रेडे
- ‘डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्री सक्षमीकरण विषयक दृष्टिकोन व त्यांच्या विचारांचा स्त्री समाजावर होणारा परिणाम’ - वैशाली ठिल्लार (मोरे) व डॉ. प्राचार्य राजकुमार मस्के
- mr.wikipedia.org/wiki/ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्रियाबाबतचा लढा
- www.dainikprabhat.com - रूपगंध लेख
- https://www.lokmat.com